जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2018
तरुण भारत

# पर्यावरणाचा पेपर १३ ऐवजी २० मे रोजी

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ अंतर्गत मार्च-एप्रिल २०१८ या द्वितीय सत्रातील परीक्षा सुरू आहेत. पर्यावरण या अभ्यासक्रमाच्या पेपर दिवशीच म्हणजे रविवार १३ मे रोजी स्पर्धा परीक्षेचा पेपर आहे. त्यामुळे या दिवशीचा पर्यावरण विषयाचा पेपर रविवार २० मे रोजी विद्यापीठाने दिलेल्या वेळापत्रकातील वेळेनुसारच होणार आहेत. तरी विद्यार्थ्यांनी याची दखल घ्यावी, असे आवाहन परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी केले आहे.



- परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांची माहिती
- स्पर्धा परीक्षेचा पेपर असल्याने वेळापत्रकात बदल

स्पर्धा परीक्षेचा पेपर असल्याने विद्यापीठ अंतर्गत नियोजित परीक्षेत बदल केला आहे. यामध्ये रविवार १३ मे रोजी बी. एस्सी., बी. एस्सी (बायोटेक), बी. एस्सी (शुगर), बी. एस्सी. (आय. टी.), बी. एस्सी. (ॲनिमेशन), बी. एस्सी. (फॅरेन्सीक सायन्स), बी. एस्सी. (फुड प्रोसेसिंग), बी. सी. ए., बी. बी. ए., लॉ. बी. टेक, बी. एस्सी. (नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी), बी. आय. डी., बी. एफ. टी. एम., बी. डेस., बी. डी. एफ. सी., बी. सी. एस., बी. फार्म, एस. ई., बी. आर्किटेक्चर., बी. टेक्सटाईल., बी. एम. एम., बी. व्होक (सर्व) या विषयांचे पेपर आहेत. या सर्व विषयांचे पेपर २० मे रोजी दिलेल्या वेळेनुसारच होणार आहेत.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
20 APR 2018
पुढारी

# शिवाजी विद्यापीठाचा पर्यावरण अभ्यास विषयाचा पेपर पुढे ढकलला

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

- १३ मे रोजीचा नियोजित पेपर रद्द
- २० मे रोजी होणार आता पेपर
- एमपीएससीचा पेपर असल्याने बदल

शिवाजी विद्यापीठाच्या द्वितीय सत्रातील 'पर्यावरण अभ्यास' या विषयाचा पेपर सुधारित निर्णयानुसार आता २० मे २०१८ रोजी होणार आहे. यापूर्वी हा पेपर १३ मे रोजी होणार होता. संबंधित पेपर दिवशीच महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब ही परीक्षा असल्याने हा पेपर पुढे ढकलण्यात आला आहे. पेपरची वेळ पूर्वनियोजित वेळेसारखीच असेल, असे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी प्रसिद्धीस दिले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2018
सकाळ


# 'पर्यावरण अभ्यास'चा पेपर आता २० मे रोजी



कोल्हापूर, ता. २४ : द्वितीय सत्रातील 'पर्यावरण अभ्यास' या विषयाच्या पेपरच्या तारखेत बदल केला आहे. हा पेपर आता २० मे रोजी नियोजित वेळेत होणार असल्याचे परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक महेश काकडे यांनी पत्रक प्रसिद्धीस दिले आहे.

बी.एसस्सी, बी.एसस्सी (बायोटेक), बी.एसस्सी. (शुगर), बी.एसस्सी. (आय.टी), बी.एसस्सी. (ॲनिमेशन), बी.एसस्सी. (फॅरेन्सिक सायन्स), बी. एसस्सी. (फूड प्रोसेसिंग), बी.एस.ए., बी.बी.ए. लॉ., बी. टेक, बी.एसस्सी. (नॅनो सायन्स टेक्नॉलॉजी), बी.आय.डी., बी.एफ.टी.एम., बी.डेस, बी.डी. एफ.सी, बी.सी.एस., बी. फार्म, एस. ई., बी. आर्किटेक्चर, बी. टेक्स्टाईल, बी. एम. एम., बी. व्होक (सर्व) आदी विभागांच्या 'पर्यावरण अभ्यास' विषयाचा पेपर रविवार १३ मे रोजी होणार होता. या दिवशी महाराष्ट्र दुय्यम सेवा अराजपत्रित गट-ब परीक्षा २०१८' स्पर्धा परीक्षा आहे. त्यामुळे सदरच्या पेपरच्या तारखेत बदल केला आहे. हा पेपर आता २० मे रोजी नियोजित होणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे. अधिक माहितीसाठी विद्यापीठाशी विद्यार्थ्यांनी संपर्क साधावा, असेही त्यांनी सुचित केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
25 APR 2018
लोकमत



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठ येथे प्रा. एन. डी पाटील प्रतिष्ठान व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनाच्या कार्यक्रमात जेष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी. पाटील यांनी मार्गदर्शन केले. यावेळी डॉ. रणधीर शिंदे, आदी उपस्थित होते.

# महर्षी शिंदे यांनी समर्पित वृत्तीने अस्पृश्योद्धाराचे काम केले

## एन. डी. पाटील : शिवाजी विद्यापीठात जयंती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांनी समर्पित आणि मिशनरीवृत्तीने आपले उभे आयुष्य अस्पृश्योद्धारासाठी वेचले, असे गौरवोद्‌गार जेष्ठ नेते प्रा. डॉ. एन. डी पाटील यांनी काढले. प्रा. एन. डी पाटील प्रतिष्ठान व महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या शिंदे जयंती समारंभाप्रसंगी ते बोलत होते.

ते पुढे म्हणाले, महर्षी शिंदे यांनी वेगवेगळ्या प्रश्नांसंबंधी मूलगामी कार्य केले. समाजसुधारणेच्या दीर्घकाळ सफरीत त्यांनी अतुलनीय असे योगदान दिले. मोलाचे काम करणाऱ्या शिंदे यांची समाजाने उपेक्षा केली. जातिभेदाची दरी मिटण्यासाठी सामंजस्य समाज घडविण्यासाठी शिंदे यांच्या विचार कार्याची प्रस्तुतता आजही असल्याचे पाटील म्हणाले.

याप्रसंगी डॉ. रणधीर शिंदे यांनी 'महर्षी विठ्ठल रामजी शिंदे यांच्या अस्पृश्योद्धाराच्या कार्याची प्रस्तुतता' या विषयावर व्याख्यान झाले.

प्रास्ताविक डॉ. टी. एस. पाटील यांनी केले. याप्रसंगी डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. अरुण भोसले, डॉ. राजन गवस, कॉ. अतुल दिघे, दशरथ पारेकर, व्यंकाप्पा भोसले, प्राचार्य सी. ए. कांबळे, डॉ. नंदकुमार मोरे, कॉ. दिलीप पवार, प्राचार्य य. ना. कदम, प्राचार्य दिनकर खांबडे उपस्थित होते. आभार शाहू महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे यांनी मानले.